Reg. No. NP CITY/236/2018-20.


# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १९]  गुरुवार, जुलै ९, २०२६/आषाढ १८, शके १९४८  [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २४.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९(१) अन्वये खालील अधिसूचना**

क्रमांक उजिभूक्र. २-मं.अ.-कावि-७२-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक-उजिभू-मं.स.-कावि-२२५-२०, दिनांक २० एप्रिल, २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसन क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३,-अ-६५-२०२६-२७, मौजा मदनापुर, तह. कुही, जिल्हा नागपूर.

| अ. क्र. | जमीन मालकाचे नांव | गट क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) हे. आर |
| १ | काशीराम शिवराम ठवकर, विमल विठोबा ईश्वरकर, गोवर्धन नत्थु ठवकर, धनराज नत्थु ठवकर, पुष्पा रामदासजी पाचबुधे, वंदना विष्णु भुतमांगे, लीना अरण बारस्कर, उर्मीला उत्तम कांबळे, जया मनिष पंचबुधे, द्वारका मनोहर फेंडर | ३८ | ०.१७ |
| | | एकूण . . | ०.१७ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव : आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर.

प्रकल्पाचे कामाचे वर्णन : अंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत किन्ही वितरिकेच्या मातीकाम व बांधकामा करीता शेतजमीन संपादित करण्याबाबत भूसंपादन प्रस्ताव.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे : आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत किन्ही वितरिकेच्या मातीकाम व बांधकामाकरीता

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन**

- निरंक -

**अनुसुची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

(१) कार्यकारी अभियंता, आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर यांचे कडील पत्र जा.क्र. २७२-चिशा-भूसंपादन-२०२६, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६.

(२) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र.जि.ओ.एस.-१०८१-(२३-१ असंज, २ मंत्रालय, मुंबई), दिनांक ३१ मार्च, १९८३ संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही, त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टीप :** उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत

**अखिलभारत मेश्राम,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

नागपूर :
दिनांक ०८ जुलै, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.